# प्रकरण ५ वे

## निष्कर्ष आणि शिफारशी

## विभाग - " अ "

## निष्कर्ष.

### ५-क: प्रास्ताविक:

प्रकरण नंबर १ ते ३ मध्ये इयत्ता १० वी च्या वर्गातील मराठी विषयाच्या अध्यापनाबाबत आढावा घेतला आहे. वरील प्रकरणे तात्वीक स्वरुपाची आहेत. प्रकरण क्रमांक ४ मध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण तज्ञ, शाळा तपासणी अधिकारी यांच्या प्रतिसादातून आणि शाळांना दिलेल्या भेटी व शिक्षकांची पाठनिरीक्षणे यातून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण आणि विशदीकरण केले आहे. या प्रकरणांच्या आधारे संशोधकाने प्रस्तुत प्रकरणात संशोधकाचे निष्कर्ष आणि शिफारशी दिल्या आहेत.

### ५-ख: शिक्षकांच्या माहितीविषयक निष्कर्ष:-

१] प्रतिसादक शिक्षकांत पदव्युत्तर प्रशिक्षीत शिक्षकांचे प्रमाण शेकडा २५ होते, तर पदवीधर प्रशिक्षीतांचे प्रमाण शेकडा ७५ होते. प्रशिक्षीत पदव्युत्तर शिक्षकांच्या शेकडा ८० शिक्षकांचा एम.ए.ला. मराठी हा विषय होता.

२] एकूण शिक्षकांच्या शेकडा ५० शिक्षकांचा पदवी परीक्षेला खास 'मराठी' हा विषय होता. प्रशिक्षीत पदवीधर शेकडा ५० शिक्षकांनी मराठीशिवाय इतर विषय पदवीला घेतले होते. शिवाय पदवीला मराठी हा गौणविषय शेकडा २२.५ शिक्षकांनी घेतलेला होता.

३] सर्व शिक्षक प्रशिक्षीत होते व त्यांचे प्रशिक्षण प्रकार व प्रमाण खालील प्रमाणे आढळून आले.

अ] बी.एड्. ९० टक्के.

ब] एस.टी.सी. ५ टक्के.

क] टी.डी. ५ टक्के.

४] एकूण शिक्षकांच्या शेकडा ४० शिक्षकांचा. प्रशिक्षणासाठी अध्यापन पध्दती म्हणून 'मराठी' हा विषय होता.

पदवीला "मराठी" विषय असणारे शेकडा ५० व प्रशिक्षणामध्ये "मराठी" अध्यापनपध्दती असणारे शेकडा ४० शिक्षक मराठी विषयाचे अध्यापन करीत होते. ते "मराठी " विषय परिणामकारक शिकविण्यास योग्य होते. शेकडा ५० शिक्षक पदवीला मराठी विषय नसणारे व प्रशिक्षण पदवीस मराठी अध्यापन पध्दती नसणारे शेकडा ६० शिक्षक मराठी अध्यापनास योग्य नव्हते. ही स्थिती मराठी अध्यापनाच्या दृष्टीने निश्चितच असमाधानकारक होती.

५] प्रतिसादक शिक्षक एकापेक्षा जास्त इयत्तांना मराठी विषय शिकवीत होते.

६] इयत्ता १० वी ला ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेले शिक्षक शेकडा ५५ होते. त्यावरुन इयत्ता १० वी ला शिकविणारे शिक्षक अनुभवी होते.

७] इयत्ता १० वी ची बोर्ड परीक्षा असल्यामुळे या वर्गाला मराठी अध्यापनासाठी जास्त अनुभवी शिक्षकांची नेमणूक केली जाते असे आढळून येते. इयत्ता १० वी ला मराठी अध्यापनाचे काम करणारे बहुसंख्य शिक्षक अनुभवी होते.

८] मराठीचे अध्यापन करणा-या शिक्षकांपैकी ८ शिक्षकांना हिंदी, ५ शिक्षकांना इंग्रजी, ६ शिक्षकांना इतिहास, ११ शिक्षकांना नागरिकशास्त्र, ४ शिक्षकांना भूगोल, २ शिक्षकांना चित्रकला व ४ शिक्षकांना कार्यानुभव विषय शिकवावा लागत होता.

यावरुन मराठी अध्यापन करणा-या सर्व ४० प्रतिसादक शिक्षकांना [शेकडा १००] मराठी शिवाय इतर विषय निरनिराळ्या इयत्तांना [ ५ वी ते १० वी पर्यन्त]शिकवावे लागत होते.

## ५-ग : शिक्षकांच्या व्यावसायीक तयारीविषयी निष्कर्ष:-

१] आपल्या ज्ञानात वाढ होण्यासाठी सर्वच शिक्षक खालील प्रकारचे प्रयत्न करीत होते.

अ] कांदबरी वाचन व नाटकांची पुस्तके वाचणारे शेकडा ८० शिक्षक .

आ] शुध्द लेखनाचे नियम वाचणारे शेकडा ७५ शिक्षक.

इ] संदर्भ ग्रंथांचे वाचन करणारे शेकडा ७० शिक्षक.

ई] निबंध वाचन करणारे शेकडा ६० शिक्षक.

उ] ललीत लेखांचे वाचन करणारे शेकडा ४० शिक्षक.

ऊ] प्राचीन काव्यवाचन करणारे शेकडा ४५ शिक्षक.

ओ] नवकाव्याचे वाचन करणारे शेकडा ५० शिक्षक.

औ] समीक्षण ग्रंथांचे वाचन करणारे शेकडा ३५ शिक्षक.

यावरुन बहुसंख्य शिक्षक कादंब-या , शुध्दलेखन नियम, संदर्भग्रंथ, निबंध वाचन, करणारे असले तरी ललीत लेखन, प्राचीन काव्य, नवकाव्य व समीक्षण ग्रंथाचे वाचन अगदीच कमी शिक्षक करीत होते. ही व्यावसाचीक तयारीच्या दृष्टीने समाधानकारक गोष्ट नव्हती.

२] अधिवेशनात, चर्चासत्रात [शेकडा २५] , परिसंवादात [शेकडा १०], कृतीसत्रात [शेकडा २५], स्वत:चे लेख प्रसिध्द करणारे [शेकडा १०] शिक्षक होते. पाठयपुस्तक विषय संशोधन प्रकल्पात तर कोणीही भाग घेत नव्हते. यावरुन व्यावसायीक तयारीच्या दृष्टीने शिक्षक कमी पडतात असे दिसून आले.

५-घ : <u>मराठी अध्यापनाच्या उद्दिष्टाविषयीचे निष्कर्ष:-</u>

१] मराठी विषयाच्या अध्यापनातून खालील प्रमाणात उद्दिष्टे साध्य होतात.

अ] विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार होतात. [ शेकडा ३०]

आ] विद्यार्थ्यांचे भावविश्व संपन्न होते. [ शेकडा ४०]

इ] विद्यार्थ्यांची जीवनदृष्टी निकोप होते. [ शेकडा २०]

ई] विद्यार्थ्यामध्ये वाङ्मयीन जाण विकसीत होते. [शेकडा ५०]

उ] विद्यार्थ्यामध्ये सामाजीक जाणीव वाढीस लागते. [शेकडा ३०]

यावरुन मराठी विषय अध्यापनाची सर्वच उद्दिष्टे फारच कमी प्रमाणात साध्य होतात असे दिसून आले. ही स्थिती निराशजनक वाटते.

२] आठवडयातून विविध शाळामध्ये मराठी अध्यापनासाठी ५ ते ७ तासीका देत असल्याचे दिसून आले. हया तासीका अपूर्ण असल्याचे मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या म्हणण्यात आले. यावरुन मराठी विषय अध्यापनास अपूरा वेळ मिळतो हे दिसून आले. इयत्ता १० वी ला मराठी विषयासाठी आठवडयाच्या ८ तासीका असल्यास अभ्यासक्रम पूर्ण होत असल्याचे दिसून आले.

३] अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शेकडा ५५ शिक्षक जादा तास घेत असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. त्यांचा हा प्रयत्न चांगला होता.

५-च: मराठी लेखन विषयक निष्कर्ष:-

१] पूर्ण निबंध सांगून शेकडा २० शिक्षक, मुददयांचे स्पष्टीकरण करून शेकडा ५५ शिक्षक व फक्त मुददे देवून शेकडा २५ शिक्षक निबंधलेखनाची तयारी करून घेत असल्याचे दिसले.

मुददयावरून स्पष्टीकरण करून निबंधाची तयारी करून घेणा-या शिक्षकांचे प्रमाण ठीक होते. निबंधाची तयारी करून घेण्याची पध्दती योग्य होती असे दिसून आले.

२] प्रत्येक पत्रप्रकारची सरावासाठी किमान २ पत्रे घेणारे शेकडा ६० शिक्षक होते. बहुसंख्य शिक्षक सरावासाठी प्रत्येक पत्रप्रकाराची २ पत्रे घेतात ही बाब समाधानकारक असली तरी एकच पत्र घेणारे ही शेकडा १० शिक्षक होते ही बाब समाधानकारक नाही.

३] योग्य दर्जाचे सारांशलेखन विद्यार्थ्यांना करता येत नाही असे बहुसंख्य शिक्षकांचे मत आहे. सरांश लेखनाच्या सरावासाठी शिक्षक खालील प्रयत्न करीत होते असे दिसून आले.

अ] सरावासाठी अनेक उतारे देणे. [ शेकडा २०]

ब] उतारा मनात वाचावयास लावून त्यावर चर्चा करणे. [ शेकडा २५]

क] अनेक उता-यांचे वाचन करावयास लावणे. [ शेकडा ४०]

यावरून बहुसंख्य शिक्षक सारांशलेखनाचा सराव योग्य प्रमाणात करत नव्हते. ही गोष्ट निश्चितच चांगली नाही.

४] विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर चांगले नसते असे शेकडा ७५ शिक्षकांनीआपले मत व्यक्त केले. त्याचबरोबर शिक्षकांचे हस्ताक्षर वाईट असतेअसे शेकडा १० मुख्याध्यापकांनी मुलाखतीमध्ये आपले मत व्यक्त केले होते.

हस्ताक्षराबददल विद्यार्थी व शिक्षक ही उदासीन वाटले.

५] विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर चांगले नसल्याबाबतची कारणे शिक्षकांनी खालीलप्रमाणे दिलेली होती.

अ] प्राथमिक स्तरावर हस्ताक्षराकडे शिक्षकांचे दुर्लक्ष असते असे शेकडा ६० शिक्षकांचे मत होते.

आ] हस्ताक्षरलेखन सुधारण्यासाठी सर्व विषय शिक्षक प्रयत्न करीत नाहीत असे शेकडा ९० प्रतिसादकांनी मत व्यक्त केले.

इ] हस्ताक्षर सुधारण्यासाठी विद्यार्थी स्वत:च उदासीन असतो. असे

शेकडा १० शिक्षकांनी स्पष्ट केले होते.

यावरून हस्ताक्षर सुधारण्यासाठी सर्व विषय शिक्षक प्रयत्न करीत नाहीत. शिवाय प्राथमिक शाळेत शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षराकडे दुर्लक्ष असते. असे बहुसंख्य प्रतिसादकांच्या मतावरून दिसून आले.

६] विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी शिक्षकांनी खालील प्रमाणे प्रयत्न केल्याचे दिसून आले.

अ] दररोज दुरेघी वहीत शुध्दलेखन लिहिणे[ शेकडा १० शिक्षक]

आ] हस्ताक्षर स्पर्धा घेणे. [ शेकडा २० शिक्षक]

इ] यावरून इयत्ता १० वी च्या बहुसंख्य मराठी विषय शिक्षकांचे हस्ताक्षर सुधारण्याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसले.

७] विद्यार्थ्यांचे लेखन शुध्द नसते असे शेकडा ८० शिक्षकांचे मत होते. शिवाय शेकडा ३० मुख्याध्यापकांचे, 'शिक्षकांचे लेखन अशुध्द असते' असे मत होते.

यावरून शुध्दलेखना बाबत विद्यार्थी व शिक्षकही उदासीन दिसून आले.

८] अशुध्द लेखनाची कारणे खालील प्रमाणे स्पष्ट केली.

अ] मराठीच्या शिक्षकांनी शुध्दलेखनविषयक चांगली तयारी केलेली नसते. [ शेकडा ६० शिक्षक]

आ] शुध्द लिखाणाविषयी विद्यार्थ्यांना आवड निर्माण झालेली नसते. [शेकडा ४०]

इ] मराठी शिवाय इतर विषय शिक्षकांचे शुध्दलेखनाकडे दुर्लक्ष असते. [ शेकडा ९०]

यावरून सर्व विषय शिक्षकांचे शुध्दलेखनाकडे दुर्लक्ष असते असे स्पष्ट होते.

<u>५-छ : क्रमीक पुस्तकातील गध-पध प्रकारा मधून उद्दिष्ट साध्य होणे विषयी निष्कर्ष:-</u>

१] योग्य विचारांची विद्यार्थ्यांना आवड निर्माण होते. [शेकडा ७५]

२] योग्य विचाराप्रमाणे विद्यार्थी वागतात. [ शेकडा ५०]

३] इतरांच्या हक्कांची जाणीव निर्माण होते. [शेकडा ३७.५]

४] योग्य सामाजीक जाणीव निर्माण होते. [ शेकडा ३७.५]

यावरून वैचारिक पाठाव्दारे 'योग्य विचारांची आवड निर्माण होणे' हे उद्दिष्ट चांगल्या प्रकारे साध्य होते. आणि 'योग्य विचाराप्रमाणे वागणे' हे उद्दिष्ट ब-या प्रमाणात साध्य होते हे स्पष्ट झाले.

५] वैचारिक पाठांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शिक्षक खालील प्रकारचे प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले.

अ] अध्ययनाची गोडी वाढविणे. [ शेकडा ४०]

ब] वैचारिक पाठाचे सतत वाचन करावयास लावणे. [ शेकडा ६०]

यावरून वैचारिक पाठांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वैचारिक पाठाचे सतत वाचन करावयास लावणारे बहुसंख्य शिक्षक होते . तर अध्ययनाची विद्यार्थ्यांना गोडी वाढविणारे थोडे शिक्षक होते.

६] कथात्मक पाठांच्या बाबतीत विद्यार्थ्यांचा आकलनात्मक प्रतिसाद चांगला असतो असे शेकडा ८० शिक्षकांचे मत होते. तर मध्यम प्रतिसाद असतो असे शेकडा २० शिक्षकांचे मत होते.

यावरून कथात्मक पाठाव्दारे विद्यार्थ्यांचा आकलनात्मक प्रतिसाद चांगला असतो. असे बहुसंख्य शिक्षकांचे मत होते.

७] कथात्मक पाठाचे अध्यापन शिक्षक खालीलप्रकारे करतात. असे आढळून आले.

अ] प्रथम कथा सारांशरूपाने सांगून पाठातील गर्भीत हेतू स्पष्ट करून वाङ्मयीन मूल्ये विषद करणे. [ शेकडा ३० शिक्षक]

आ] गोष्टीरूपाने सारांश सांगून अध्यापन करणे[शेकडा ६० शिक्षक]

इ] कथा सारांशरूपाने सांगून कथन पध्दतीने स्पष्ट करणे. [ शेकडा १० शिक्षक]

यावरून हे स्पष्ट होते की, बहुसंख्य शिक्षक'गोष्टीरूपाने कथेचा सारांश सांगून' कथात्मक पाठाचे अध्यापन करत होते.

८] प्राचीन वाङ्मयाचे पाठ इयत्ता १० वी ला अभ्यासक्रमात ठेवण्याचे हेतू शिक्षकांनी खालील प्रमाणे सांगितले.

अ] प्राचीन वाङ्मयाची मुलांना कल्पना येणे. [ शेकडा ६० शिक्षक]

आ] प्राचीन वाङ्मयाचे ज्ञान होणे व तत्कालीन मराठी भाषा कशी होते याची जाणीव होणे. [ शेकडा ५० शिक्षक]

इ] प्राचीन आचार- विचार, संस्कृती, रूढी यांची ओळख होणे. [ शेकडा ४० शिक्षक]

ई] संतवाङ्मय संस्काररक्षम असल्याने योग्य संस्कार रूजविणे. [शेकडा ६० शिक्षक]

यावरून 'प्राचीन वाङ्मयाची मुलांना कल्पना येणे व योग्य संस्कार रूजविणे.' हे प्राचीन वाङ्मयाचे पाठ अभ्यासक्रमात ठेवण्याचे हेतू आहेत असे बहुसंख्य शिक्षकांचे मत होते.

९] प्राचीन वाड.मयाचे हेतू अध्यापनाव्दारे साध्य करण्यासाठी शिक्षक खालील प्रयत्नकरत होते.

अ] प्राचीन वाड.मयाच्या पाठाचे सतत वाचनकरावयास लावतो.[ शेकडा ३० शिक्षक]

आ] प्राचीन रुढी व सध्याच्या रुढी, प्राचीन भाषा व अर्वाचीन भाषा याची तुलना करावयास लावतो. [ शेकडा २० शिक्षक]

इ] तत्कालीन मानवी जीवन कसे होते याची कल्पना देतो. [ शेकडा२५ शिक्षक.

यावरुन प्राचीन वाड.मयाचे सतत वाचन करावयास लावतो हे काही शिक्षकांचे मत होते. प्राचीन वाड.मयाच्या बाबतीत विधार्थ्यांची प्रगती योग्य नव्हती. असे दिसून आले.

१०] नवकाव्याची अभ्यासक्रमातील उद्दिष्टे स्पष्ट करण्याबाबत शिक्षकानी खालील प्रमाणे मते व्यक्त केली.

अ] मुलांना नवीन काव्याची महती कळावी.[ शेकडा ४० शिक्षक]

आ] विधार्थ्यांनी नवविचाराने आचरण करावे.[ शेकडा २० शिक्षक]

इ] दैनंदिन व्यवहारातील,अनुभवातील खरे दर्शन घडावे.[ शेकडा ४० शिक्षक]

यावरुन हे स्पष्ट होते की, नवकाव्याची महती कळावी व दैनंदिन जीवनातील ख-या गोष्टींचे दर्शन घडावे ही नवकाव्याची उद्दिष्टे आहेत. असे बहुसंख्य शिक्षकांचे मत होते.

११] नवकाव्याचे हेतू साध्य करण्यासाठी शिक्षक खालील प्रमाणे प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते.

अ] नवकाव्याचे परिणामकारक वाचन करतो.[ शेकडा ४० शिक्षक]

आ] प्रतिकांचा व प्रतिमांचा वापर कसा केला आहे हे स्पष्ट करतो. ][शेकडा ५० शिक्षक]

इ] कवीची भूमिका स्पष्ट करतो.[ शेकडा ६० शिक्षक]

यावरुन हे स्पष्ट होते की, नवकाव्यामध्ये कवीची भूमिका कोणती हे स्पष्ट करणारे आणि प्रतिकांचा व प्रतिमांचा वापर स्पष्ट करणारे बहुसंख्य शिक्षक होते. प्रत्यक्षात हे प्रयत्न बरेच कमी असल्याचे आढळून आले.

५-ज : मराठी अध्यापन पध्दतीविषयी निष्कर्ष:-

आपले अध्यापन योग्य दर्जाचे होण्यासाठी शिक्षक आपल्या अध्यापनात खालील अध्यापनपध्दतींचा वापर करीत असल्याचे दिसते.

१] स्पष्टीकरण पध्दती [ शेकडा ९०], कथन पध्दती [ शेकडा ७०] , प्रश्नोत्तर पध्दती [ शेकडा ७०], वर्णनात्मक पध्दती [ शेकडा ६०], चर्चा पध्दती - [शेकडा ६०], नाट्यीकरण पध्दती [ शेकडा ४५], रसग्रहण पध्दती [ शेकडा ४०], व्याख्यान पध्दती [ शेकडा ३५], मूकवाचन पध्दती [ शेकडा ३५], समालोचन पध्दती [ शेकडा २०] व समग्र पध्दती [ शेकडा १०]

यावरून हे स्पष्ट होते की, स्पष्टीकरण पध्दती, कथन पध्दती व प्रश्नोत्तर पध्दतीने बहुसंख्य शिक्षक अध्यापन करीत होते. तर नाट्यीकरण पध्दती, रसग्रहण पध्दती, व्याख्यान पध्दती, मूकवाचन पध्दती, समालोचन पध्दती व समग्र पध्दतीने अध्यापन करणारे फारच कमी शिक्षक होते असे दिसते.

प्रतिसादक शिक्षक सर्वच अध्यापनपध्दतींचा कमी अधिक प्रमाणात अध्यापन कार्यात उपयोग करतात. व्यक्तीपरत्वे व घटकपरत्वे विविधता असणे साहजिकच आहे.

५ - झ : मराठी व्याकरणाच्या अध्यापनाविषयी निष्कर्ष:-

१] विद्यार्थ्यांना व्याकरण अवगत न होण्याची कारणे शिक्षकानी खालील प्रमाणे स्पष्ट केली.

अ] व्याकरणाची विद्यार्थ्यांना आवड नसते. [ शेकडा ६५ शिक्षक]

आ] खालच्या वर्गात व्याकरणाकडे दुर्लक्ष असते. [ शेकडा ६० शिक्षक]

इ] व्याकरणाचा अभ्यास विद्यार्थ्यांना अवघड वाटतो. [ शेकडा ५५ शिक्षक]

ई] पाठांतराचे प्रमाण व्याकरणात जास्त असते. [ शेकडा २५]

उ] व्याकरणातील संकल्पना समजण्यास कठीण असते. [ शेकडा २० शिक्षक]

ऊ ] व्याकरणातील भाषा क्लिष्ट असते. [ शेकडा १५ शिक्षक]

ओ] हिंदी, इंग्रजी भाषांचा मराठीवर दुष्परिणाम होतो. [ शेकडा ५ शिक्षक]

यावरून 'व्याकरणाची विद्यार्थ्यांना आवड नसते,' 'खालच्या वर्गात व्याकरणाकडे दुर्लक्ष असते.' व व्याकरणाचा अभ्यास विद्यार्थ्यांना अवघड वाटतो असे बहुसंख्य शिक्षकांचे मत होते.

२] विद्यार्थ्यांना व्याकरण अवगत होण्यासाठी शिक्षक खालील प्रयत्न करत असल्याचे दिसते.

अ] मुलांना समजतील, सोपी वाटतील, अशी त्यांच्या परिचयातील अनेक उदाहरणे देतो. [ शेकडा ५० शिक्षक]

आ] व्याकरणाची भिती घालवून आवड निर्माण करतो. [ शेकडा २० शिक्षक]

इ] व्याख्या देतो, पाठांतर करुन घेतो, चार्टस, तक्ते वर्गात लावून व्याकरणाचे नियम विद्यार्थ्यांच्या डोळ्यापुढे ठेवतो.[ शेकडा ३० शिक्षक]

ई] अनेक उदाहरणावरुन व्याख्या, नियम तयार करुन घेतो व पाठांतराव्दारे त्याचे दृढीकरण करुन घेतो. [ शेकडा २० शिक्षक]

बहुसंख्य शिक्षक मुलांना समजतील, सोपी वाटतील अशी त्यांच्या परिचयातील अनेक उदाहरणे देउन विद्यार्थ्यांना व्याकरण अवगत करण्याचा प्रयत्न करत होते. व्याकरणाच्या बाबतीत उद्दिष्ट साध्य होण्यासाठी शिक्षकांचे प्रयत्न अपूरे होते असे दिसून आले.

## ५-ट : मराठी गद्य-पद्य उता-यांच्या आकलनाविषयी निष्कर्ष:-

१] गद्य-पद्य आकलनासाठी ५ उता-यापेक्षा जास्त उतारे सरावासाठी घेणा-या शिक्षकांचे प्रमाण शेकडा २० होते. ५ उता-यापेक्षा कमी उतारे सरावासाठी घेणा-या शिक्षकांचे प्रमाण शेकडा ८० होते.

यावरुन मराठी गद्य-पद्य उता-यांच्या आकलनासाठी पुरेसे उतारे घेतले जात नाहीत असे दिसून आले.

२] आकलनाबाबत विद्यार्थ्यांचा मध्यम प्रतिसाद मिळतो असे शेकडा ७० शिक्षकांचे मत होते. भरपूर प्रमाणात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळतो, असे म्हणणा-या शिक्षकांचे प्रमाण शेकडा १० होते व कमी प्रमाणात प्रतिसाद मिळतो असे म्हणणारे शेकडा २० शिक्षक होते.

यावरुन आकलनाबाबत चांगला प्रतिसाद मिळत नाही हे दिसून आले.

३] मराठी अध्यापनाची कौशल्ये वाढीसाठी भाषिक खेळांचे आयोजन करता येईल असे शेकडा ४० शिक्षकांचे मत होते. तर भाषिक खेळांचे आयोजन करता येणार नाही असे शेकडा ६० शिक्षकांचे मत होते.

यावरून मराठी अध्यापनाची कौशल्ये वाढीसाठी भाषिक खेळाचे आयोजन करता येणार नाही असे म्हणणारे बहुसंख्य शिक्षक होते. बहुसंख्य शिक्षकाना भाषिक खेळाचे आयोजन माहित नव्हते किंवा त्यांना ते आयोजितकरण्याचे महत्त्व वाटत नव्हते.

४] अध्यापन कौशल्य वाढीसाठी खालील भाषिक खेळाचे आयोजन करता येईल असे शिक्षकांनी स्पष्ट केले.

अ] शब्दांच्या भेंडया लावणे. [ शेकडा ४० शिक्षक]

आ] लेखन - वाचन स्पर्धा घेणे. [ शेकडा ५० शिक्षक]

इ] नाटयवाचन स्पर्धा व कथाकथन स्पर्धा घेणे. [ शेकडा १० शिक्षक]

लेखनवाचन स्पर्धा घेणे व भेंडया घेणे यावर बहुसंख्य शिक्षकांचा भर असल्याचे दिसत असले तरी भाषिक खेळांच्या बाबतीत शिक्षक उदासिन असल्याचे जाणवते.

५] गणित, इंग्रजी प्रमाणे विद्यार्थी मराठी विषयाला महत्त्व देत नाहीत असे शेकडा ९० शिक्षकांचे मत आहे.

यावरून बहुसंख्य विद्यार्थी मराठी विषयाला गणित, इंग्रजी प्रमाणे महत्त्व देत नाहीत. मराठी हा विषय सोपा असतो. त्यामुळे तो केव्हाही करता येईल. त्यासाठी परिश्रम घेण्याची गरज नाही. गणित शास्त्राप्रमाणे हया विषयाला काही विद्याशाखामध्ये महत्त्व नसते असे विद्यार्थ्यांना वाटल्याने त्याचे महत्त्व वाटत नाही. शाळेतील वातावरणही मराठी विषयाला महत्व देणारे नसते.

६] विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची आवड निर्माण होण्यासाठी शिक्षक खालील प्रयत्न करतात हे स्पष्ट होते.

अ] विद्यार्थ्यांना नवनवीन पुस्तके वाचावयास देणे. [ शेकडा २० शिक्षक]

आ] निबंध, वक्तृत्व, काव्यगायन स्पर्धाचे आयोजन करणे. [शेकडा २० शिक्षक]

इ] अध्यापन करताना गोष्टी, विनोद, चुटके सांगणे. [ शेकडा १० शिक्षक]

ई] सोप्या भाषेत विषय विवेचन करणे. [ शेकडा ५० शिक्षक]

यावरून सोप्या भाषेत विषय विवेचन करून विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची आवड निर्माण होण्यासाठी बहुसंख्य शिक्षक प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. परंतु सर्व दृष्टीने शिक्षक प्रयत्नशील नव्हते हे स्पष्ट होते. ही बाब निराशाजनक वाटते.

५-ठ : अध्यापन साहित्यविषयक निष्कर्ष:-

१] पाठय पुस्तकांची विद्यार्थ्यांकडे उपलब्धता असते. असे शेकडा ८० शिक्षकांचे

मत होते.

बहुसंख्य विद्यार्थ्यांकडे मराठी विषयाचे पाठयपुस्तक असले तरी काही विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे पुस्तक नव्हते.

२] आपल्या अध्यापन कार्यात खालील शैक्षणिक साधनांचा शिक्षक उपयोग करीत असल्याचे स्पष्ट होते.

अ] फलकाचा उपयोग [ शेकडा १०० शिक्षक]

आ] आकाशवाणीचा उपयोग [ शेकडा ९० शिक्षक]

ई] चित्रांचा उपयोग [ शेकडा ३५ शिक्षक]

उ] ध्वनिफीत व दूरदर्शनचा उपयोग [ शेकडा १५]

औ] चित्रपट्टीचा उपयोग [ शेकडा ५]

फलकाचा व आकाशवाणीचा अध्यापनात वापर करणारे बहुसंख्य शिक्षक होते. असे प्रतिसादकांनी दिलेल्या मतानुसार स्पष्ट होत असले तरी संशोधकाला प्रत्यक्ष भेटीतून व निरीक्षणातून सर्व शाळामधून आकाशवाणीचा उपयोग शिक्षक करीत नसल्याचे दिसले. त्याची कारणे पुढील प्रमाणे होती.

अ] आकाशवाणी कार्यक्रमाच्या वेळी मराठी विषयाचा वेळापत्रकात तास नसतो.

आ] आकाशवाणीच्या कार्यक्रमामुळे अभ्यासक्रम संपविणे जमत नाही.

ई] काही वेळेला शिक्षकांचा आळसही कारणीभूत ठरतो.

ऊ] काही शाळांत रेडिओचीही उपलब्धता नसते.

चित्रांचा उपयोग करणे शिक्षकांना शक्य होते पण तरीही शेकडा ३५ शिक्षकच त्याचा उपयोग करीत होते. यावरुन शिक्षकांची अध्यापनसाहित्याविषयी बेफिकीरी दिसून येते.

-५-ड] अभ्यासपूरक उपक्रमाविषयी निष्कर्ष:-

१] शेकडा ७० शाळांत शालेय ग्रंथालय असल्याचे आढळले. शालेय ग्रंथालयात वाङ्मयीन पुस्तकांची उपलब्धता असल्याचे शेकडा ७० शिक्षकांचे मत होते.

शालेय ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ असल्याचे शेकडा ५० शिक्षकांनी स्पष्ट केले. याचा अर्थ सर्व शाळा मध्ये ग्रंथालय उपलब्ध नव्हते व संदर्भ पुस्तकांची उपलब्धता समाधानकारक नव्हती. उपलब्ध असलेली पुस्तके वाटप करणारे शेकडा ४५ शिक्षक व वाचलेल्या पुस्तकावर चर्चा करतो असे म्हणणारे शेकडा ४० शिक्षक होते.

यावरून पुस्तके वाटण्याची व्यवस्था समाधानकारक नव्हती. शिक्षकांचीही उदासीनता दिसून येते.

२] तपासणीस अधिकारी व मुख्याध्यापकांच्या मुलाखतीव्दारे हे स्पष्ट झाले की,

बहुतेक शाळांतून ग्रंथालयात पुस्तकांची संख्या पुरेशी नसते. तसेच पुस्तकांचे विद्यार्थ्यांना नियमित वाटप केले जात नाही. शिवाय वाचलेल्या पुस्तकावर चर्चा वादविवाद असे उपक्रमही आयोजित केले जात नाहीत. ग्रंथालयामध्येही संदर्भ ग्रंथांची उणीव दिसून येते.

यावरून आवांतर वाचन व संदर्भग्रंथ वाचन याबाबतची स्थिती निराशाजनक होती.

३] प्रत्येक शाळेत किमान ३ दैनिके उपलब्ध असल्याचे आढळले.

४] विद्यार्थ्यांच्या मौखीक प्रगटीकरणासाठी वक्तृत्वस्पर्धा [ शेकडा ९० शिक्षक] भाषणे [ शेकडा ९० शिक्षक],

कथाकथन [ शेकडा ७० शिक्षक], प्रसंगवर्णन [शेकडा ५०], गटचर्चा [ शेकडा २५ शिक्षक], परिसंवाद [ शेकडा २५ शिक्षक], व अनुभव कथन [ शेकडा १० शिक्षक] या उपक्रमांचे आयोजन करीत होते असे दिसून आले.

यावरून वक्तृत्व स्पर्धा, भाषणे, कथाकथन व प्रसंगवर्णन हे उपक्रम समाधानकारकपणे आयोजित केले जात होते. पण गटचर्चा , परिसंवाद व अनुभव कथन हे उपक्रम समाधानकारकपणे राबविले जात नव्हते असे आढळूनआले.

५] विद्यार्थ्यांच्या भाषीक विकासास प्रेरणा मिळण्यासाठी शिक्षक खालील स्पर्धांचे आयोजन करत असल्याचे आढळून आले.

हस्ताक्षर स्पर्धा [ शेकडा ८५ शिक्षक], शुध्द लेखन स्पर्धा [शेकडा ७५ शिक्षक], निबंधलेखन स्पर्धा [ शेकडा ७५ शिक्षक], वाचनस्पर्धा [शेकडा ५० शिक्षक], काव्यगायन स्पर्धा[ शेकडा ४५ शिक्षक], नाटयवाचन स्पर्धा [ शेकडा ४० शिक्षक] व शब्दकोडे [ शेकडा १० शिक्षक]

यावरून हस्ताक्षर स्पर्धा, शुध्दलेखन स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा घेणारे बहुसंख्य शिक्षक होते तर वाचन स्पर्धा , काव्यगायनस्पर्धा, नाटयवाचन स्पर्धा व शब्दकोडे या स्पर्धा आयोजित करणा-या शिक्षकांचे प्रमाण खूपच कमी होते.

## ५-ढ : मूल्यमापनाविषयी निष्कर्ष:-

१] मार्च ८८ ला इयत्ता १० वी ला मराठी विषयात उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ६० होते. उत्तीर्ण मुलापैकी ८० ते १०० गुणांनी उत्तीर्ण झालेल्या

मुलांचे प्रमाण शेकडा ५ होते. ६० ते ७९ गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ५ होते. ४५ ते ५९ गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ४० होते व ३५ ते ४४ गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ५० होते.

२] मार्च ८९ ला इयत्ता १० वी ला मराठी विषयात उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ७० होते. उत्तीर्ण मुलांपैकी ८० ते १०० गुणानी उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा १० होते. ६० ते ७९ गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा २० होते. ४५ ते ५९ गुणमिळवून उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ३० होते. तर ३५ ते ४४ गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ४० होते.

३] - मार्च ९० ला इयत्ता १० वी ला मराठी विषयात उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ६५ होते. उत्तीर्ण मुलांपैकी ८० ते १०० गुणानी उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ५ होते. ६० ते ७९ गुणानी उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा २५ होते. ४५ ते ५९ गुणानी उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा २५ होते. व ३५ ते ४४ गुणानी उत्तीर्ण झालेल्या मुलांचे प्रमाण शेकडा ४५ होते.

यावरुन हे स्पष्ट होते की, मराठी विषयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण समाधानकारक असते. तरी जास्त गुण मिळवून म्हणजे ६० ते १०० गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फारच कमी व असमाधानकारक होते. मराठी विषयाकडे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे दुर्लक्ष असल्याचे निष्पन्न होते.

३] मराठीचा प्रत्येक घटक शिकवून झाल्यावर शेकडा ४५ शिक्षक त्यावर घटकचाचणी घेतात असे आढळून आले.

यावरुन शेकडा ५५ शिक्षक प्रत्येक घटकानंतर घटक चाचणी घेत नाहीत हे स्पष्ट होते.

४] वर्ष भरात इयत्ता १० वी ला मराठी विषयाच्या घटक चाचण्या शिक्षक खालील प्रमाणे घेत होते.

अ] १० घटक चाचण्या घेणारे शेकडा १० शिक्षक होते.

आ] ८ घटकचाचण्या घेणारे शेकडा १० शिक्षक होते.

ई] ६ घटक चाचण्या घेणारे शेकडा २० शिक्षक होते.

उ] ४ घटक चाचण्या घेणारे शेकडा ५० शिक्षक होते.

ओ] २ घटकचाचण्या घेणारे शेकडा १० शिक्षक होते.

यावरून ४ घटक चाचण्या घेणारे बहुसंख्य शिक्षक असले तरी जास्तीत जास्त घटक चाचण्या घेणारे शिक्षक फारच कमी होते असे दिसते. ही स्थिती मराठी अध्यापनाच्या यशस्वीतेच्या दृष्टीने निश्चितच हानीकारक आहे.

५- ण : प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाविषयी निष्कर्ष:-

१] बोर्डाच्या मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाविषयी व गुणदानाविषयी शिक्षकांनी खालील मते मांडल्याचे स्पष्ट झाले.

अ] एस.एस.सी. बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत बदल घडवून आणावा असे शेकडा ६० शिक्षकांनी मत व्यक्त केले.

आ] गद्य दीर्घोत्तरी प्रश्नांना ६ गुणाऐवजी ४ गुण ठेवावेत. तसेच लघुत्तरी प्रश्नांना ४ गुणाऐवजी ३ गुण ठेवावेत असे शेकडा ६० शिक्षकांचे मत होते.

ई] पद्य दीर्घोत्तरी प्रश्नांना ६ गुणाऐवजी ४ गुण ठेवावेत असे शेकडा ४० शिक्षकांचे मत होते.

उ ] कमी केलेल्या या गुणाचे वस्तुनिष्ठ प्रश्न जास्त ठेवून त्यांना गुण द्यावेत. असे शेकडा ५० शिक्षकांचे मत होते. ओ] व्याकरणाच्या अभ्यासक्रमावर. प्रश्नसंख्या वाढवून व्याकरणाच्या प्रश्नाचे गुण वाढवावेत असे शेकडा ५० शिक्षकांचे मत होते.

यावरून असे स्पष्ट होते की, मराठी विषयाच्या एस.एस.सी. च्या प्रश्नपत्रिकेत वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या आहे त्यापेक्षा थोडी वाढवावी. असे बहुसंख्य शिक्षकांचे मत दिसले.

२] मराठी विषयाचा बोर्डाच्या परीक्षेचा निकाल वाढविण्यासाठी शिक्षक खालील प्रयत्न करीत असल्याचे आढळले.

अ] अभ्यासक्रम संपला नाही तर जादा तास घेणे. [ शेकडा २० ]

आ] गैरहजर विद्यार्थ्यांना व पालकांना हजेरीबद्दलचे महत्त्व पटवून सांगणे . [ शेकडा ३० शिक्षक ]

इ] उन्हाळ्याच्या सुट्टीत"वासंतीक वर्ग" चालविणे. [ शेकडा २० शिक्षक ]

ई] नित्यनियमाने अभ्यास करण्याची सवय लावणे. [ शेकडा ७० शिक्षक ]

उ] आवांतर वाचनाची सवय वाढविणे. [ शेकडा १५ शिक्षक ]

ऊ] अध्यापनामध्ये नवनवीन अध्यापन पध्दतींचा वापर करणे. [ शेकडा ५० शिक्षक ]

ओ] लेखन सुवाच्च व शुध्द ठेवणे. [ शेकडा ३० शिक्षक ]

औ] व्याकरणाचे पाठांतर करणे. [ शेकडा ५० शिक्षक]

अं] पत्रलेखन सुवाच्च व विषयानुरूप घेणे. [ शेकडा ४० शिक्षक]

अः] मागील वर्षांच्या बोर्डाच्या प्रश्नपत्रिका सोडविणे. [शेकडा ८० शिक्षक]

नियमाने अभ्यास करावयास लावावा व शेवटी मागील वर्षाच्या बोर्डाच्या प्रश्नपत्रिका सोडवून घ्याव्या असे बहुसंख्य शिक्षकांचे मत असल्याचे दिसून आले. यावरून हा प्रयत्न यशस्वीतेच्या दृष्टीने योग्य आहे.

३] मराठी विषयाच्या निकालवृध्दीसाठी ; मुख्याध्यापक, शाळा तपासणी अधिकारी व शिक्षण तज्ञ यानी मुलाखतीमध्ये खालील प्रयत्न शिक्षकांनी करावयास पाहिजेत हे स्पष्ट केले होते.

अ] उन्हाळ्याच्या सुट्टीत इयत्ता १० वी च्या विधार्थ्यांचे मराठीचे तास आयोजित करावेत.

आ] व्याकरणाची वैचारिक पाठांची व प्राचीन वाङ्‌मयीन पाठांची जादा तयारी करून घ्यावी.

ई] बोर्डाच्या मागील वर्षाच्या किमान ५ प्रश्नपत्रिका सोडवून घ्याव्यात.

यावरून मुख्याध्यापक, शाळा तपासणी अधिकारी व शिक्षण तज्ञ यानीही निकालाविषयी चांगल्या सूचना केल्या आहेत.

४] गुणवंत विधार्थी "गुणवत्ता यादीत" येण्यासाठी खालीलप्रमाणे शिक्षक प्रयत्न करीत होते.

अ] हुषार मुलांना वैयक्तीक मार्गदर्शन करतात. त्याना ज्या ज्या अडचणी येतात. त्या जातीने सोडवितात. लेखी कामात चुका न होतील याची काळजी घेतात. नियमित अभ्यास करावयास प्रवृत्त करतात असे शेकडा ६० शिक्षकांनी सांगितले.

इ] चाचण्या वारंवार घेवून ते विधार्थी कोठे चुकतात त्याबाबत अचूक मार्गदर्शन करतात असे शेकडा ४० शिक्षकांनी सांगितले.

ई] व्याकरण, हस्ताक्षर, शुध्दलेखन याकडे विशेष लक्ष देतात असे शेकडा ५० शिक्षकानी सांगितले.

बहुसंख्य शिक्षक हुषार मुलांना मार्गदर्शन करणे. त्यांच्याअडचणी सोडविणे. लेखन शुध्द ठेवणे व नियमित अभ्यास करावयास लावणे असे प्रयत्न करून गुणवत्ता यादीत हुषार मुलांचा नंबर आणण्याचा प्रयत्न करीत होते. ही गोष्ट फारच

चांगली आहे.

यावरुन बहुसंख्य शिक्षक आपापल्या परीने, विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्यासाठी प्रयत्न करीत होते असे आढळले तरी अनेक शाळातून प्रत्यक्ष पाहिले असता असे प्रयत्न ग्रामीण भागात फारच थोडया शाळातून चालतात असे संशोधकास आढळून आले.

## विभाग"ब"

## शिफारशी

५ - त : मराठी विषय अध्यापनाच्या शिक्षकांविषयी शिफारशी:-

१] मराठी विषय घेवून पदवीधर झालेल्या किंवा मराठी विषय घेवून पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या शिक्षकांचीच मराठी अध्यापक म्हणून नेमणूक करण्यात यावी. याशिवाय बी.एड्. पदवीस मराठी अध्यापन पध्दती घेतलेल्या शिक्षकांचीच मराठी अध्यापक म्हणून नेमणूक करावी.

२] अनुभवी शिक्षकाकडेच इयत्ता १० वी ला मराठी विषय शिकविण्यासाठी द्यावा.

३] मराठी विषय शिक्षकांना इतर मराठीशी संबंधित नसलेले विषय शिकविण्याचे काम देण्यात येऊ नये.

४] आपल्या ज्ञानात वाढ होण्यासाठी शिक्षकांनी विविध वाङ्मय प्रकारांची पुस्तके, संदर्भ ग्रंथ वाचावेत. याशिवाय शिक्षण संक्रमण , महाराष्ट्र एज्युकेशनल जर्नल यासारख्या नियतकालीकांतून येणारे लेख वाचावेत. ज्ञानाच्या बाबतीत अद्ययावतपणा असावा.

५] अधिवेशनात, चर्चासत्रात, कृतीसत्रात, परिसंवादात, पाठयविषयक संशोधन प्रकल्पामध्ये शिक्षकांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा.

याबाबत मुख्याध्यापकांनी शिक्षकांना संधी द्यावी. शासनाने शिक्षकांना अशा प्रशिक्षण वर्गांना जाण्यासाठी प्रोत्साहन देउन सर्व प्रकारे सहाय्य करावे.

६] स्वत:चे काही शैक्षणिक लेख लिहिण्याचे शिक्षकांनी प्रयत्न करावेत.

७] इयत्ता ८ वी ते १० वी अशा सलग इयत्तांना एकाच शिक्षकांकडे मराठी विषय शिकविण्यासाठी देण्याबाबत, विषय वाटणी करतांना विचार व्हावा.

५ - थ : मराठी अध्यापनाच्या उद्दिष्टा बाबतच्या शिफारशी:-

१] मराठी अध्यापनाची विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्नशील असावे.

२] मराठी विषयाला आठवडयाच्या ८ तासीका घ्याव्यात.

३] अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सर्व शिक्षकांनी जादा तास घ्यावेत.

५ - द : मराठी लेखनकार्य उद्दिष्टांविषयी शिफारशी :-

१] निबंध लेखनाची खालील प्रकारे तयारी करून घ्यावी.

अ] प्रत्येक प्रकारचे किमान ४ निबंध घ्यावेत.

आ] प्रत्येक प्रकारचा पहिला निबंध मुददयाचे स्पष्टीकरण करून नंतर विद्यार्थ्यांना लिहावयास सांगावा.

दूस-या निबंधाचे फक्त मुद्दे देउन विद्यार्थ्यांना निबंध लिहावयास सांगावा. तिसरा व चौथा निबंध विद्यार्थ्यांना लिहावयास सांगावा. नंतर ते निबंध शिक्षकांनी तपासून त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. चुकांची दुरुस्ती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. वाचनाची सवय वाढवावी. जे जे दिसते ते निरीक्षण करून पाहाण्याची सवय लावावी. जे जे ऐकू येते तै चिकित्सा करून ऐकण्याची सवय वाढवावी. या मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निबंध लेखन करावे.

२] पत्रलेखन कौशल्य प्राप्त होण्यासाठी खालील प्रकारे शिक्षकांनी प्रयत्न करावेत.

अ] सरावासाठी प्रत्येक पत्र प्रकारांची ३ किंवा ४ पत्रे घ्यावीत.

आ] स्वत:चा पत्ता लिहीण्याची पध्दत, पत्राचा सुरुवातीचा व शेवटचा मायना, विषयानुरूप मजकूर लिहिण्याची सवय विद्यार्थ्यांना लावावी.

३] योग्य सारांशलेखन, करण्यासाठी शिक्षकांनी खालील प्रयत्न करावेत.

अ] गद्य व पद्य असे प्रत्येक प्रकारचे किमान ६ उतारे सरावासाठी घ्यावेत.

आ] गद्य उतारा किंवा पद्य उतारा विद्यार्थ्यांना देवून त्या उता-याचे दोन वेळेस मनात वाचन करावयास लावावे. त्यावर मनन करावे. त्या उता-यात काय सांगितले आहे. त्यावर विचार करण्याची विद्यार्थ्यांना सवय लावावी. नंतर स्वत:च्या मोजक्या शब्दात सारांश लेखन करावे.

४] विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात सुधारणा होण्यासाठी शिक्षकांनी खालील स्वरूपाचे प्रयत्न करावेत.

अ] इयत्ता ५ वी पासूनच हस्ताक्षर सुधारण्याबाबत प्रयत्न करावेत.

आ] मराठी विषय शिक्षकाने हस्ताक्षर सुधारून घेण्यासाठी निरनिराळे उपक्रम आयोजित करावेत.

उदा. दुरेघी वहीवर लिहून घेणे, हस्ताक्षर स्पर्धा.

ई] इतर विषय शिक्षकांनी हस्ताक्षर सुधारण्याबाबत मराठी विषय शिक्षकांस सर्वोतोपरी मदत करावी.

उ] शिक्षकांचे फलक लेखन सुवाच्च असावे.

५] विद्यार्थ्यांचे लेखन शुध्द होण्यासाठी सर्व विषय शिक्षकांनी खालील स्वरूपाचे प्रयत्न करावेत.

अ] इयत्ता ९ वी पर्यंत शुध्द लेखन विषयक तयारीकरून घ्यावी. शुध्दलेखनाचे महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पटवून द्यावे.

आ] शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लेखनातील चुकांचे गटवार दिग्दर्शन व मार्गदर्शन करावे

इ] शुध्दलेखन स्पर्धा आयोजित कराव्यात.

ओ] विद्यार्थ्यांचे लेखन तपासून चांगल्या लेखनाचे कौतुक करावे.

औ] विद्यार्थ्यांचे लेखन तपासताना हस्ताक्षर, शुध्दलेखन, व्याकरण शुध्दता, विरामचिन्हे, योग्य विचार मांडणी, भाषाशैली या बाबी तपासाव्यात.

अं] शिक्षकांचे लेखन शुध्द असावे.

## ५ - ध : क्रमीक पुस्तकातील गद्य-पद्य प्रकाराबाबतच्या शिफारशी :-

१] वैचारिक पाठांचे उद्दिष्टे साध्य होण्यासाठी शिक्षकाने लेखकाचे मत सोप्या भाषेत स्पष्ट करून सांगावे. लेखकाची भूमिका विद्यार्थ्यांपुढे योग्य शब्दात मांडावी. लेखकाचे विचार विद्यार्थी समजून उमजून घेतील असे आपले अध्यापन कौशल्य पणास लावावे. विद्यार्थ्यांना वैचारिक पाठांचे वाचन करावयास लावावे.

२] कथात्मक पाठांचे अध्यापन करतांना शिक्षकाने कथेमागील कथाकराचा उद्देश कथाप्रकार, कथेचा आरंभ, कथेचा मध्य व कथेचा शेवट, कथावैशिष्टये व कथाकराची लेखनवैशिष्टये, सांगून कथेचे प्रगट वाचन करावे. नंतर विद्यार्थ्यांना

प्रश्न विचारत कथा संपवावी.

३] प्राचीन वाङ्मयाच्या पाठांचे अध्यापन करताना शिक्षकाने, सद्यस्थितीत असलेली मराठी भाषा व प्राचीन मराठी भाषा यांची तुलना करावी. निरनिराळ्या शब्दांची रूपे कशी आहेत हे पाहावे. तत्कालीन आशा-आकांक्षा रूढी, नित्य जीवनदर्शन, आचार-विचार हेवे-दावे, भौतिक स्थिती याबाबतची पूर्ण माहिती अध्यापनाव्दारे स्पष्ट करावी. लेखकाचा हेतू स्पष्ट करावा. म्हणजे प्राचीन वाङ्मयाची उद्दिष्टे साध्य होऊ शकतील. शिवाय प्राचीन वाङ्मयाच्या अध्यापनामध्ये दृक्-श्राव्य साधनांचा वापर करावा.

४] नवकाव्याचे अध्यापन योग्य दर्जाचे होण्यासाठी शिक्षकांनी खालील प्रयत्न करावेत.

नवकाव्याचे योग्य वाचन करावे. प्रत्येक शब्दाचा आशय लक्षात घ्यावा. प्रतिकांचा आणि प्रतिमांचा वापर कसा केला आहे ते स्पष्ट करावे. मुक्त-छंदात असलेल्या अनेक कवितांचे वाचन योग्य रितीने करावे. समाजातील चाली-रिती, अनिष्ट रूढी, व संघर्षमय जीवनाचे यथार्थ वर्णन स्पष्ट करावे. नवकाव्याची आपल्या अध्यापनाव्दारे विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करावी.

**५ - न : मराठी अध्यापन पध्दती बाबतच्या शिफारशी :-**

अ] इयत्ता १० वी च्या वैचारिक पाठांचे अध्यापन प्रश्नोत्तर पध्दती, चर्चा पध्दती व कथन पध्दतीव्दारे करावे.

आ] कथात्मक पाठांचे अध्यापन स्पष्टीकरण व कथन पध्दतीने करावे.

इ] ललीत लेखांचे अध्यापन चर्चा पध्दतीने व वर्णन पध्दतीने करावे.

उ] संतकाव्याचे अध्यापन रसग्रहणात्मक व स्पष्टीकरण पध्दतीने करावे.

औ] घटकपरत्वे अध्यापन पध्दती वापरावी.

**५ - प : मराठी व्याकरणाच्या अध्यापनाबाबतच्या शिफारशी:-**

अ] व्याकरणाच्या अध्यापनात शास्त्रीय चिकित्सेपेक्षा त्याच्या कार्यात्मक बाजूवर भर द्यावा.

आ] कवितांचे अध्यापन करताना ज्या त्या वृत्तांची व छंदाची माहिती द्यावी.

ई] अलंकाराच्या अध्यापनात नियम, व्याख्या प्रमाणेच सुंदर व कलात्मक अभिव्यक्ती मध्ये त्यांचा उपयोग याची जाणीव विद्यार्थींना यावी.

उ] उद्गामी व अवगामी पध्दतींचा जास्त प्रमाणात उपयोग करावा. व्याकरणाच्या अध्यापनात अनेक प्रकारची उदाहरणे देणे, त्याचे वर्गीकरण करणे, तुलनाकरणे व त्यातून सामान्य तत्व,:, सिध्दान्त शोधण्यास प्रवृत्त करणे श्रेयस्कर ठरते. अवगामी पध्दतीव्दारे शोधलेल्या तत्त्वाचे नवीन संदर्भात उपयोजन करणे, या प्रक्रीयेचा उपयोग करावा. मात्र उदाहरणे विद्यार्थ्यांच्या नित्यपरीचयाचीच असावीत. समास, अलंकार शिकविताना उदाहरणे देणे, लक्षणे, व्याख्या, काढून घेणे व पुन्हा नवीन उदाहरणे देऊन त्यांची लक्षणे पडताळणे हा क्रम ठेवावा. शिवाय समास अलंकाराच्या वापरामुळे बोलणे, लिहीणे, कसे सुलभ व सोयीस्कर आणि परिणामकारक होते. त्याचा प्रत्यय आणून द्यावा.

५ – क : मराठी गद्य-पद्य उता-याच्या आकलनाविषयी शिफारशी:-

अ] सरावासाठी किमान ५ उतारे द्यावेत.

आ] स्वत:च्या शब्दात सारांशलेखन कसे करावे हे पटवून सांगावे.

ई] आकलनासाठी प्रथम विद्यार्थ्यांना सोपा उतारा द्यावा. नंतर काठीण्य पातळीनुसार विचार करून उतारे सरावासाठी द्यावेत.

उ] शिक्षकानी आपले अध्यापन कौशल्य वाढीसाठी खालील प्रयत्न करावेत.

१] शब्दकोडे, शब्दभेंड्या, काव्यभेंडया व अशा खेळांचे आयोजन करावे.

२] विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौध्दिक परिपक्वता व त्यांचे पूर्वानुभव लक्षात घेवून त्याना झेपतील अशा गोष्टी, त्यांच्या पूर्वानुभवाशी निगडीत केल्या पाहिजेत. हस्ताक्षर स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, काव्यगायन स्पर्धा, नाटयवाचन स्पर्धा आपल्या शाळांमधून अगत्याने आयोजीत केल्याने विद्यार्थ्यांना प्रवर्तन मिळून ते या स्पर्धामध्ये भाग घेण्यासाठी उत्साहाने तयारी करातील.

ओ] मराठी विषयाची गोडी वाढावी म्हणून शिक्षकांनी खालील प्रयत्न करावेत.

१] भाषीक स्पर्धांचे आयोजन करावे.

२] मातृभाषेचे महत्त्व पटवून द्यावे.

३] मातृभाषेव्दारे लवकर ज्ञान ग्रहण करता येते. हे पटवून सांगणे.

४] गद्य-पद्य पाठातील सौंदर्य स्थळे दाखवावी, आवांतर वाचनाची गोडी निर्माण करावी. काव्यगायन चालीवर करावे. निरनिराळे भाषीक

खेळ आयोजीत करावे.

५ -ब : अध्यापन साहित्याबाबत शिफारशी :-

अ] प्रत्येक विद्यार्थ्यांकडे मराठीचे पाठयपुस्तक असलेच पाहीजे. याबाबत शिक्षकांने प्रयत्नशील असावे. शाळा व्यवस्थापनाने, माजी विद्यार्थी, दानशूर व्यक्ती, यांच्याकडून व सामाजीक संस्थाकडून मदत मिळवावी व गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके पुरवावीत.

आ] आपल्या अध्यापन कार्यात शिक्षकांनी विविध शैक्षणिक साधनांचा उपयोग करावा.

इ] शैक्षणिक साधन निर्मितीमध्ये विद्यार्थ्यांचे सहकार्य घ्यावे.

उ] संदर्भ ग्रंथ, ज्ञानकोश व शब्दकोशांचा शिक्षकांनी जास्त उपयोग करावा.

ओ] आकाशवाणीचा अध्यापनामध्ये उपयोग करुन घ्यावा.

औ] दूरदर्शनाचा शिक्षणकार्यात जास्त उपयोग करावा.

अं] शिक्षण खात्याने शैक्षणिक साधनांची उपलब्धता करुन द्यावी.

५- भ : अभ्यासपूरक उपक्रमाविषयी शिफारशी :-

अ] संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात भरपूर असावेत. आणि ह्या बाबीकडे शिक्षण खात्याने कसोशीने लक्ष द्यावे.

आ] शालेय वाचनालयातील उपलब्ध पुस्तकांचे विद्यार्थ्यांना नियमितपणे वाटप करावे. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा वादविवाद घडवून आणावेत.

इ] शाळांतून नियतकालीकांचे व दैनिकांची उपलब्धता जास्त प्रमाणात असावी. शिक्षकांनी त्यांचा उपयोग शिक्षणकार्यात करुन घ्यावा. वाचनीय अशा शैक्षणिक लेखांची कात्रणे संग्रहीत करावीत. दैनिकांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करुन घ्यावे.

उ] इयत्ता १० वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक देवाण-घेवाण होण्यासाठी आपले विचार व्यवस्थितपणे मांडण्यासाठी, परिसंवाद, गटचर्चा असे उपक्रम आयोजित करावेत. यामुळे दुस-यांची मते समजावून घेण्याची वृत्ती निर्माण होईल.

ओ] विद्यार्थ्यांच्या मौखीक प्रगटीकरणासाठी भाषणे, वक्तृत्वस्पर्धा, कथाकथन व प्रसंगवर्णन या उपक्रमांचे आयोजन करावे.

[illegible]] विद्यार्थ्यांच्या भाषीक विकासास प्रेरणा मिळण्यासाठी शिक्षकांनी

खालील प्रयत्न करावेत.

१] हस्ताक्षर स्पर्धा, शुध्दलेखन स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा, आयोजीत कराव्यात.

२] उच्चार दृढीकरणासाठी वाचनस्पर्धा ठेवाव्यात.

३] विद्यार्थ्यांच्या रसास्वादन शक्तीच्या विकासासाठी गायन स्पर्धा ठेवाव्यात.

४] नाटयभिरुचीच्या विकासासाठी नाटयवाचन स्पर्धा ठेवाव्यात.

५-म : मराठी विषयातील उत्तीर्णतिबद्दल शिफारशी:-

अ] विद्यार्थ्यांना मराठी विषयात जास्तीत जास्त गुण कसे मिळतील याचा शिक्षकांनी सतत प्रयत्न करावा.

आ] एस.एस.सी. चा निकाल हा फक्त शिक्षकावरच अवलंबून नाही, तर निकाल वाढविण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी, पालक, अभ्यासक्रम, वातावरण प्रश्नपत्रिकेचे स्वरूप हे घटक जबाबदार आहेत. तरीही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शिक्षकाने पालकाबरोबर चर्चा करावयास हवी. शिक्षक पालक मेळावे आयोजीत करावेत. त्यावेळी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी पालकांना मार्गदर्शन करावे.

इ] शिक्षकाने विद्यार्थ्यांना नियमीत, सतत अभ्यास, पहाटे वाचन करावयाची सवय लावावी. याबाबत मार्गदर्शन करावे. फक्त उत्तीर्ण होण्याला महत्त्व न देता मराठी विषयाचे पूर्णज्ञान देण्याबाबत शिक्षकाने प्रयत्न करावयास हवेत.

उ] उन्हाळ्यात मराठी विषयाचे वर्ग चालवावेत.

औ] रात्री अभ्यासिकेची सोय करावी.

औ] प्रत्येक घटक शिकवून झाल्यावर त्याचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक घटकावर घटक चाचणी घेणे जरूरीचे आहे.

अं] शालेय वातावरण योग्य असावे. शाळेची इमारत सर्व सुखसोयीनीयुक्त अशी असावी. स्वच्छता असावी. आरोग्याच्या दृष्टीने वर्गखोल्यांची रचना असावी. प्रसन्न वातावरण राहील अशा सुविधा असाव्यात.

५-य : शालान्त परीक्षेच्या मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाविषयी शिफारशी:-

अ] दीर्घोत्तरी प्रश्नांचे गुण कमी करून कल्पनाविस्तार हा भाग ठेवावा. वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या वाढवावी.

आ] तीन तासात प्रश्नपत्रिका पूर्ण सोडवून होत नाही. त्यासाठी शिक्षकानी जास्तीत जास्त प्रश्नपत्रिका सोडवून घेण्याचा सराव करावयास हवा.

लिखाणाचा वेग कसा वाढेल याचे मार्गदर्शन शिक्षकांनी करावे.

इ] गुणवंत विद्यार्थी "गुणवत्ता यादीत" येण्यासाठी खालील प्रयत्नकरावेत.

१] इयत्ता १० वी ला आल्यानंतरच अशा विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्याऐवजी इयत्ता ८ वी, ९ वी पासूनच अशा विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन द्यावे.

२] लेखन, वाचन, नियमित अभ्यास, प्रश्नांच्या उत्तरलेखनाबाबत, सुवाच्च अक्षराबाबत, शिक्षकाने योग्य असे मार्गदर्शन करावे.

३] पहाटेच्या वाचनाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आणून द्यावे.

४] क्रमीक पुस्तकांचे सतत वाचन करावयास लावावे.

५] अशा विद्यार्थ्यांचे लेखन कटाक्षाने तपासावे. त्यातील चुका निदर्शनास आणून त्या दुरुस्त करून घ्याव्यात.

६] अशा मुलांच्या चाचण्या वारंवार घ्याव्यात.

७] अशा मुलांकडे वैयक्तीक लक्ष देऊन त्यांना मार्गदर्शन करावे.

८] इयत्ता १० वी चा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर किमान मागील ५ वर्षांच्या बोर्डाच्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात. त्या तपासून शिक्षकाने योग्य मार्गदर्शन करावे.

## विभाग " क "

## पुढील संशोधनासाठी विषय

" माध्यमिक शाळातील मराठी विषयाच्या अध्यापनाचा अभ्यास" या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. ही व्याप्ती कमी करून अभ्यासकाने प्रस्तुत संशोधन केले आहे. मराठी अध्यापनाची अनेक अंगे आहेत. या अंगांचा आणि बाजूंचा सखोल अभ्यास व्हावा.

प्रस्तुत संशोधन करीत असताना अभ्यासकास मराठी अध्यापनातील अशा अनेक अंगांचा अभ्यास करणे शक्य झालेले नाही. मराठी अध्यापन प्रभावी होण्यासाठी या अंगांचा जरूर विचार व्हावा असे संशोधकास वाटते. प्रस्तुत संशोधन करीत असताना संशोधकास मराठी अध्यापनातील असे काही विषय आढळले की, [ त्यावर प्रकाश टाकता येईल. ] ते विषय पुढे दिलेले आहेत.

५ - र : ग्रामीण बोलींचा विद्यार्थ्यांच्या मराठी अध्ययनावर होणारा परिणाम:-

विद्यार्थी ज्या ग्रामीण परिसरात शालेय वेळे शिवाय असतात, तो कालावधी शालेय वेळेपेक्षा निश्चितच जास्त असतो. त्या कालावधीत त्या परिसरात बोलल्या जात असलेल्या भाषेचा विद्यार्थ्यांवर प्रतिकूल संस्कार होत असतो. ग्रामीण बोलींचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम आणि त्यामुळे प्रमाण भाषेत व विद्यार्थ्यांच्या भाषेत पडणारे अंतर- त्याची कारणे आणि त्यावर उपाय या दृष्टीने अभ्यास होणे आवश्यक आहे. असे वाटते.

५-ल : प्राथमिक स्तरावर शुध्दलेखनासाठी योग्य पध्दतींचा अभ्यास:-

मराठी लेखन कार्यात शुध्दलेखन ही एक मोठी समस्या बनलेली आहे. बहुतेक मुलांचे लेखन अशुध्द असते. काही शिक्षकांचेही लेखन अशुध्द असते. शुध्दलेखन ही एक प्रयत्न साध्य बाब आहे. यासाठी प्राथमिक स्तरावरच शुध्दलेखनाविषयी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ■ ते परिणामकारक ठरेल. ग्रामीण बोलीमुळे लेखन अशुध्द येते. शिक्षकांच्या अशुध्द लेखनामुळेही विद्यार्थी अशुध्द लिहीतात. या गोष्टींचा विद्यार्थ्यांच्या लेखनावर कोणकोणता परिणाम घडून येतो? याची कारणे शोधून उपाय योजना करणे आवश्यक आहे. याबाबत अभ्यास होणे गरजेचे आहे.

५-व] विविध मराठी घटकांच्या अध्यापनासाठी सुयोग्य अध्यापन पध्दतींच्या वापराबद्दलचा अभ्यास:-

मराठी विषयात अनेक घटक आहेत. कोणत्या वर्गात कोणते पाठ्यांश कोणत्या अध्यापनपध्दतीने अधिक परिणामकारकरितीने शिकविता येतात याबाबत अधिक अभ्यास होणे आवश्यक वाटते. त्यासाठी काही शिक्षकांनी संघटितपणे मराठी विषयातील घटकांपैकी काही घटक विशिष्ट अध्यापन पध्दतींनी प्रयोगशील वृत्तीने शिकवून त्याचे फलीत जर तपासले तर अशा संघटीत कार्यातून एकूण मराठीतील अध्यापन घटकांच्या अध्यापनाबाबत इतर शिक्षकांना मार्गदर्शन मिळू शकेल.

५-श : मराठी अध्यानामध्ये भाषिक खेळांचे आयोजन करण्याबाबतचा अभ्यास:-

शिक्षकांनी आपले अध्यापन कौशल्य वाढविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना अध्ययना-मध्ये जास्तीत जास्त गोडी वाटावयास हवी. त्यासाठी शिक्षकांनी मराठी अध्यापना मध्ये निरनिराळ्या भाषिक खेळांचा वारंवार वापर केल्यास अध्यापन कसे परिणामकारक

होते. याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

५-स: <u>मराठी अध्यापनामध्ये दृक-श्राव्य साधनांचा उपयोग करणे व त्याचा अध्यापनावर होणारा परिणाम पाहाणे :-</u>

प्रत्यक्ष कथन, स्पष्टीकरण या पध्दतीमध्ये विद्यार्थी कंटाळून जाण्याचा संभव असतो. आपल्या अध्यापनामध्ये दृक-श्राव्य साधनांचा वापर केल्यास विद्यार्थी अध्ययनात गुंगून जातो. यासाठी शिक्षकांनी आपल्या अध्यापनात दृक-श्राव्य साधनांचा वापर व त्याचा परिणाम याचा अभ्यास करणे आवश्यक वाटते.

५-ष: <u>घटक चाचण्या व स्वाध्यायांच्या सातत्याचा विद्यार्थ्यांच्या मराठी अध्ययनावरील परिणाम:-</u>

मराठी विषयाच्या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना यश मिळणे हे त्यांना शाळेतून दिल्या जात असणा-या लेखन सरावावर निश्चित अवलंबून असते. विद्यार्थ्यांना सातत्याने चाचण्या देणे, योग्य प्रकारचे प्रश्न त्यामध्ये विचारणे, संविधान तक्ता करणे, वेळेचे बंधन ठेवणे, विविध, पाठ्यांशावर विविध प्रकारचे प्रश्न विचारणे या सर्व सरावांचा विद्यार्थ्यांच्या लेखी प्रगटीकरण शक्तीवर कितपत अनुकूल परिणाम होतो याचाही अभ्यास होणे आवश्यक आहे असे वाटते.

-====-